# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २७९/२०२४ दिनांक:- ३०/०७/२०२४.

## "अंधाराचा फायदा घेवुन महिलाचा विनंयभंग करुन जखमी करणाऱ्या सराईत आरोपीतास अटक करण्यात गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा यांना यश"

दिनांक २३/०७/२०२४ रोजी रात्री ११.५० वाजताचे सुमारास नवघर रोड, साईबाबा नगर, भाईंदर पूर्व ता.जि ठाणे येथे यातील फिर्यादी नामे खुशबु प्रदिप सोलंकी, व्यवसाय-नोकरी, रा. रुमनं ३०८, बी विंग, रामेश्वरधाम बिल्डींग, नवघर रोड, भाईंदर पुर्व या कामावरुन रस्त्याने घरी येत असताना यातील अज्ञात आरोपीत यांने तक्रारदार यांचा पाठलाग करुन तक्रारदार यांना पाठीमागुन मिठी मारुन तक्रारदार यांचे स्त्री मनास लज्जा उत्पन्न केली तसेच ब्लेडचा धाक दाखवुन तक्रारदार यांना सेक्स करणेकरीता बळजबरी केली तेव्हा तक्रारदार यांनी आरोपीतास त्या गोष्टीस विरोध केला असता त्याने तक्रारदार यांना डावे हाताला ब्लेड मारुन ठोश्याबुक्यांनी मारहाण केली आहे. म्हणुन दिले फिर्यादी वरुन नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा रजी नं. ४२५/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७४,७५,७६,७८,११८-१, ११५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वरिष्ठांचे आदेशान्वये सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा मार्फतीने करण्यात येत होता. गुन्हयाचे घटनास्थळी मिळुन आलेले सी.सी.टी.व्ही. फुटेज व गुप्त बातमीदार याच्या मार्फतीने संशयीत इसमाचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदार यांचेकडुन मिळालेल्या माहीती प्रमाणे सदर संशयित इसम हा गणपत पाटील नगर, गल्ली नं. ०४, न्यु लिंक रोड, बोरीवली पश्चिम, मुंबई याठिकाणी राहत असल्याची माहीती मिळुन आली त्या अनुशंगाने दिनांक २९/०७/२०२४ रोजी १९.५० वाजता बोरीवली येथे त्याचे रहाते घरात मिळुन आलेला आहे. त्यास त्याचे नावं पत्ता विचारता त्याने आपले नांव दिपक गोवींद माळी, व्यवसाय-गायकी, रा. गणपत पाटील नगर, गल्ली नं. ०४, न्यु लिंक रोड, बोरीवली पश्चिम, मुंबई, असे सांगीतले आहे. त्यास दाखल गुन्हयांचे संबधाने विचारपुस करता त्याने सदर गुन्हयांची कबुली दिलेली आहे. आरोपीत यांना पुढील कारवाईकामी नवघर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शना खाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.निरी/अविराज कुराडे, सपोनिरी प्रशांत गांगुर्डे, पुष्पराज सुर्वे, पोउनि राजु तांबे, सहा पोउनि/संदिप शिंदे, पो.हवा/पुष्पेंद्र थापा, संतोष लांडगे, सचिन हुले, विजय गायकवाड, सुधीर खोत, विकास राजपुत, पो.शि./सनी सुर्यवंशी, प्रशांत विसपुते, धिरज मेंगाणे, सौरव इंगळे तसेच पो.हवा/संतोष पाटील, नवनाथ घुगे, सुरज घुनावत, पो.शि/नवनाथ पवार, संकेत मगर, एम.एस.एफ./कुणाल हिवाळे सर्व नेमणुक नवघर पोलीस ठाणे यांनी केली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास नवघर पोलीस ठाणे मार्फत करण्यात येत आहे.



---------------000000--------------